केंद्र शासनाचा "दिव्यांग व्यक्तींचा हक्क कायदा २०१६" (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील 'कलम ४८' नुसार राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचे मूल्यमापन अभ्यास पाहणी करण्यासंबंधात मार्गदर्शक सुचना.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: मूमाअ -१०१९/०१/प्र.क्र. ८०/का-१४१७
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : ३१ जुलै, २०१९

वाचा:-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक वियोमू-१९९८/प्र.क्र.६ / का-१४१३, दिनांक ३०/९/१९९८
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएपी-१०१४/प्र.क्र. १९८/का-१४८१ दिनांक २७/८/२०१४
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. मूमाअ १०१६/ प्र.क्र.७८ / का-१४१७, दिनांक २२/७/२०१६
४) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मूमाअ - १०१७/ ५७९/ प्र.क्र. ७५/ का-१४१७ दिनांक ६-७-२०१७
५) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक मूमाअ १०१६/प्र.क्र.७८/का-१४१७, दिनांक २७/९/२०१७
६) नियोजन विभाग, शासन निर्णय पुरकपत्र क्रमांक डीएपी - १०१६/ प्र.क्र. ८३/का-१४८१ दिनांक २५/९/२०१८

प्रस्तावना:

नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक वियोमू-१९९८ /प्र.क्र.६ /का-१४१३, दिनांक ३०/९/१९९८ अन्वये राज्यस्तरीय योजनासंबंधात प्रकल्पपूर्व / समवर्ती व / प्रकल्पपश्चात मूल्यमापन अभ्यास पाहणी करण्यात येतात. राज्यस्तरीय योजनांचे वरील ३ प्रकारे मूल्यमापन अभ्यास पाहणी करण्याकरीता अर्थ व सांख्यिकी संचालनालय ही प्रमुख यंत्रणा घोषित केलेली आहे. अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत प्रामुख्याने राज्यस्तरीय योजनांचे मूल्यमापन अभ्यास करण्यात येतात. तसेच विभागीय स्तरावर उपायुक्त (नियोजन) व जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडुन जिल्हास्तरीय योजनांचे मूल्यमापन अभ्यास, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएपी-१०१४/प्र.क्र. १९८/का-१४८१ दिनांक २७/८/२०१४ अन्वये करण्यात येतात. यासंबंधात उपरोक्त नमूद शासन निर्णय व शासन परिपत्रके व वेळोवेळी मार्गदर्शक सुचना नियोजन विभागाने निर्गमित केल्या आहेत.

२. केंद्र शासनाचा "दिव्यांग व्यक्तींचा हक्क कायदा २०१६" (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील "कलम ४८" च्या तरतुदी अनुसार राज्य शासन राबवित असलेल्या विविध राज्यस्तरीय योजना व जिल्हास्तरीय योजनेचा दिव्यांग व्यक्तींना लाभ होतो का व दिव्यांग व्यक्तींच्या गरजा लक्षात घेऊन संबंधीत योजनांमध्ये आवश्यक ते बदल करणे किंवा स्वतंत्र योजना राबविणे आवश्यक आहे का हा उद्देश मूल्यमापन अभ्यास पाहणीद्वारे पूर्ण होणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर याकरीता शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय

केंद्र शासनाचा "दिव्यांग व्यक्तींचा हक्क कायदा २०१६" (The Rights of Persons with Disabilities Act, २०१६) मधील 'कलम ४८' नुसार दिव्यांग व्यक्तींच्या मुलभूत गरजा लक्षात घेऊन शासनाच्या विविध राज्यस्तरीय योजनांचे मूल्यमापन अभ्यास पाहणी अपर संचालक (Additional Director) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी व जिल्हास्तरीय योजनांचे मूल्यमापन अभ्यास पाहणी करताना संबंधित उपायुक्त (नियोजन) व जिल्हा नियोजन अधिकारी यांनी दिव्यांग व्यक्तींना शासनाच्या विविध योजनांतर्गत देय असलेले लाभ प्राप्त होत आहे किंवा कसे याबाबतची वस्तुस्थिती मूल्यमापन अभ्यास पाहणीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक राहील. तसेच दिव्यांग व्यक्तींच्या गरजा विचारात घेऊन अशा योजनांमध्ये आवश्यक सुधारणा होण्याकरीता मूल्यमापन अभ्यास पाहणीच्या आधारे योजनेच्या व्याप्तीमध्ये बदल करणे किंवा स्वतंत्र योजना राबविणे याबाबतीत विशिष्ट शिफारशी अंतर्भूत करणे अनिवार्य राहील.

२. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर हा शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८०११७४५११०६१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HEMANT DATTA BHANGLE

Digitally signed by HEMANT DATTA BHANGLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=31cc357a98de35264e3f32a02a11a5f444ac03f702947b9db1e018f1ec6ec357, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3e3482a3b78b132fd024af2073b3b3aa28fe67898c829b2dc628c953bb336e14, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=HEMANT DATTA BHANGLE
Date: 2019.08.01 17:50:31 +05'30'

(हेमंत भांगले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव, मलबार हील, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ४०००0६
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
३) मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
४) मा. राज्यमंत्री, (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
५) मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई - ३२
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई-३२ (सर्व)

७) अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, मुंबई
८) आयुक्त, अपंग कल्याण संचालनालय, पुणे
९) विभागीय आयुक्त, (सर्व)
१०) जिल्हाधिकारी (सर्व)
११) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
१२) उप सचिव, का-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, (सर्व)
१४) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१५) निवड नस्ती का-१४१७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२